# छंद पुष्परचनेचा - १९

दिवाळीच्या सर्व मराठी रसिक वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा !

दिवाळी म्हणजे दिव्यांचा, रंगांचा उत्सव ! या दिवाळीची शोभा वाढविण्यासाठी फुलापानांच्या रांगोळ्या व त्यात लावलेले दिवे अशा रचना आपण यावेळी बघणार आहोत.

ॲस्टर, शेवंती, गुलाब, झेंडू व निशीगंध अशा वेगवेगळ्या फुलांच्या पाकळ्यांबरोबर विड्याच्या पानांचा वापर करुन काही रांगोळ्या तयार केल्या आहेत.



फोटो १, २, ३ मिळून एक रांगोळी पूर्ण होते. यात मध्यभागी समई ठेवली आहे. फोटो १ मध्ये समई भोवती विड्याची पाने व झेंडू व त्याभोवती हिरवी पाने असे पहिले वर्तुळ पूर्ण केले आहे. त्याभोवती गुलाबी रंगाच्या ॲस्टरने दुसरे वर्तुळ पूर्ण केले आहे. त्यावर शेवंतीची फुले पणत्यांप्रमाणे ठेवली आहेत. त्याभोवती पुन्हा विड्याच्या पानांनी तिसरे वर्तुळ पूर्ण केले आहे.



फोटो २ मध्ये काही विड्यांच्या पानांभोवती पिवळ्या झेंडूने पाकळी तयार केली आहे.



फोटो ३ मध्ये उरलेल्या विड्याच्या पानांभोवती गुलाबी ॲस्टरने पाकळ्या पूर्ण केल्या आहेत व रांगोळी पूर्ण केली आहे. अशा तऱ्हेने रांगोळी कितीही मोठी वाढवता येते. या रांगोळीत आवडेल तिथे पणत्या ठेवल्यास रांगोळीची शोभा आणखी वाढेल.



फोटो ४ मध्ये मध्यभागी पेटवलेली पणती व त्याभोवती विड्याच्या पानांचा वापर केला आहे. विड्याच्या पानावर ॲस्टरची फुले ठेवली आहेत. या छोट्या रांगोळीवरुन अगदी सहज अनेक कल्पना वाचकांना सुचतील व स्वत:च्या आवडीनुसार रंगसंगती व फुलांचा वापर करुन रांगोळ्या काढता येतील.



फोटो ५ मध्ये समया व लामणदिवे याचा वापर केला आहे. पांढऱ्या निशीगंधाच्या फुलांचा काड्यांप्रमाणे वापर केला आहे.

फोटो ६ मध्ये जरा वेगळ्या षट्कोनी आकारात रांगोळी काढली आहे.





फोटो ७ मध्ये त्याच रांगोळीत दिवे लावलेले आहेत.

या रांगोळ्या पाहून नक्कीच आपल्याला वेगवेगळ्या कल्पना सुचतील व त्याचा उपयोग दिवाळीच्या वेळी घर सजवताना होईल.

ही दिवाळी आपणा सर्वांना सुखाची, समाधानाची व आनंदाची जावो अशी पुन्हा एकदा शुभेच्छा !

धन्यवाद !

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर
asdssd@gmail.com